## || अनिरुद्ध पाठ ||

अनिरुद्ध म्हणा अनिरुद्ध म्हणा । दु:खियांचे दु:ख बापू हरी ॥
वाचे घेता नांव जाई अहंभाव । येई सोऽहंभाव उदयासी ॥
जे हो गुरुनाम तेचि हरिनाम । जाणा हेचि वर्म भक्तीपंथी ।।
रामकृष्ण हरी बापू त्रिपुरारि । राहो ओठावरी नाम सदा ॥१॥
अनिरुद्ध म्हणा अनिरुद्ध म्हणा । दु:खियांचे दु:ख बापू हरी ॥
अनिरुद्ध हरी मंत्र षडक्षरी । वाचे जो उच्चारी तो तरला ॥
अनिरुद्ध हरी जपे जो अंतरी । कामादि सहा अरि तेणे जिंकले ॥
अनिरुद्ध हरी स्मरा निरंतरी । तेणे मुक्ती चारी होती सिद्ध ॥
अनिरुद्ध हरी या नामगजरी । प्रगटे समोरी महाविष्णू ॥२॥
अनिरुद्ध म्हणा अनिरुद्ध म्हणा । दु:खियांचे दु:ख बापू हरी ॥
अनिरुद्ध माझा वैकुंठीचा राजा । मज तन्नामाचा जडो छंद ॥
हृदयाचे स्पंदन श्‍वासाचे चलन । होवो त्यात गान अनिरुद्ध ॥
परा व पश्यन्ती मध्यमा वैखरी । गावोत एका स्वरी अनिरुद्
नसांत भिनावे रक्‍तात भिजावे । कंठी प्रगटावे गुरुनाम ॥३॥
अनिरुद्ध म्हणा अनिरुद्ध म्हणा । दु:खियांचे दु:ख बापू हरी ॥
नाम हे पावन जेथे याचे गान । तेथे नारायण प्रतिष्ठित ॥
सोपे हे साधन नामसंकीर्तन । तेणेचि प्रसन्न चक्रपाणी ॥
हरिनामाहून गुरुनामस्मरण । आवडे हे कथन केशवाचे ॥
हरी तो निर्गुण होऊनिया सगुण । केले नामधारण अनिरुद्ध ॥४॥
अनिरुद्ध म्हणा अनिरुद्ध म्हणा । दु:खियांचे दु:ख बापू हरी ॥
बापू साईनाथ स्वामी तो समर्थ । तोचि एक नाथ अनाथांचा ॥
द्‍वारकामाईत होता जो राहात । शिरडीचा संत अनिरुद्ध ॥
अक्कलकोटास होता ज्याचा वास । संतावसंत तो अनिरुद्ध ॥
तीही रुपे पूर्ण आजही तो पूर्ण । सर्वथा संपूर्ण अनिरुद्ध ॥५॥
अनिरुद्ध म्हणा अनिरुद्ध म्हणा । दु:खियांचे दु:ख बापू हरी ॥
गुरु मकरंद यांचे राखी ब्रीद । ऐसा शिष्यकोविद अनिरुद्ध ॥

स्वामी आणि साई दोघे भिन्न नाही । हेचि तत्व देई अनिरुद्ध ॥
गुरु आणि भक्त होता एक चित्त । काही ना रहात अशक्य जगी ॥
ऐसी शिकवण आम्हासी देऊन । दिले सोपे साधन अनिरुद्धे ॥६॥
अनिरुद्ध म्हणा अनिरुद्ध म्हणा । दु:खियांचे दु:ख बापू हरी ॥
अनिरुद्ध नाम गाई जो सप्रेम । त्यास नित्यनेम भेटे हरी ॥
गुरुनाम गोड ज्यास याचे वेड । कैवल्याचे झाड त्याच्या द्‌वारी ॥
अनिरुद्धपाठ पंढरीची वाट । चाले जो ही नीट तो उद्धरे ॥
नाम अनिरुद्ध पूर्ण ब्रह्म शुद्ध । करी हे समृद्ध साधकासी ॥७॥
अनिरुद्ध म्हणा अनिरुद्ध म्हणा । दु:खियांचे दु:ख बापू हरी ॥
नाम हा साबण चित्त जे मलीन । त्याचे प्रक्षालन करीत असे ॥
नाम हरे भीती मना देई शक्‌ति । तेणे घडे भक्‌ती नवविधा ॥
घेऊनिया हाती नामाचा हातोडा । भिंत सारी पाडा तेलियाची ॥
तारेल संसारी नामाची ही होडी । नेई पैलथडी सुखेनैव ॥८॥
अनिरुद्ध म्हणा अनिरुद्ध म्हणा । दु:खियांचे दु:ख बापू हरी ॥
अव्यक्‌ते आकारा आला हा पसारा । त्याच्या पैलपारा हरी राहे ॥
हरीचे जे स्थान तेचि गुरुस्थान । नाही दोघे भिन्न एकरुप ॥
हरीऊनी श्रेष्ट परि गुरुतत्व । गुरुचे महत्व सर्वोपरी ॥
वंदी नारायण गुरुचे चरण । ऐसे नाथवचन भागवती ॥९॥
अनिरुद्ध म्हणा अनिरुद्ध म्हणा । दु:खियांचे दु:ख बापू हरी ॥
गुरु आणि हरी दोघे उभे समोरी । पाय आधी तरी गुरुचे धरा ॥
हरीच्या अगोदर गुरुनाम घ्यावे । सर्वाआधी वंदावे गुरुदेवा ॥
गुरुने दावीला गोविंद आम्हाला । म्हणूनी तयाला आधी स्मरू ॥
गुरु व गोविंद आम्हा अनिरुद्ध । नाम त्याचे सिद्ध कालत्रयी ॥१०॥
अनिरुद्ध म्हणा अनिरुद्ध म्हणा । दु:खियांचे दु:ख बापू हरी ॥
गुरुनामजप निरसी विकल्प । करी एकरुप सद्‌गुरुसी ॥
नाम हे जपता पावे शिष्य गुरुता । ऐसी ही महता गुरुनामी ॥
गुरु नाम घ्या हो फोडूनिया टाहो । येईल पहा हो धावुनि हरी ॥

विष्णू अविनाशी भुले ना मायेसी । परि नामी त्यासी ओढ भारी ॥११॥
अनिरुद्ध म्हणा अनिरुद्ध म्हणा । दु:खियांचे दु:ख बापू हरी ॥
गुरुनाम घेऊन जावे त्या शरण । करावे रुदन विरहानॆ ॥
आम्ही तुझे भक्त कैसे रे व्यथित । करी रे कृतार्थ आम्हा आता ॥
ऎसे जो वदून करील क्रंदन । द्रवेल हरिमन करुणेने ॥
सद्गुरुचे नाव विरहाचा भाव । यांनी वासुदेव भेटे झणी ॥१२॥
अनिरुद्ध म्हणा अनिरुद्ध म्हणा । दु:खियांचे दु:ख बापू हरी ॥
नामाचा पुकार इतुका प्रखर । वैकुंठी ना स्थिर राही नरहरी ॥
प्रल्हादाचा शब्द राखे नरहरी । आला स्तंभांतरी प्रगटून ॥
गजेंद्राची हाक जैसी परिसूनी । येई चक्रपाणि गरुडावरी ॥
ऎसा बहुतांसी नामे प्राप्त झाला । हरी ना निराळा नामाहुनी ॥१३॥
अनिरुद्ध म्हणा अनिरुद्ध म्हणा । दु:खियांचे दु:ख बापू हरी ॥
नामप्रेमे हरी पावे नामदेव । नामे ज्ञानदेव होई ज्ञानी ॥
नामाचा विस्तार आहे हो केवढा । आकाशाएवढा नामे तुका ॥
सद्गुरुनामात रमे एकनाथ । झाला भागवत नामे ऎका ॥
साऱ्या संतांचा हा एकचि विचार । नाम हेचि सार दृढ धरी ॥१४॥
अनिरुद्ध म्हणा अनिरुद्ध म्हणा । दु:खियांचे दु:ख बापू हरी ॥
नामातच राम नाम आत्माराम । नाम हा विराम संसृतीचा ॥
नामे हनुमान करी हो उड्डाण । नामे हे विमान श्रीरामाचे ॥
नामे सागरांत तरले पाषाण । मग का कठीण मानवासी ॥
अनिरुद्धराम हेचि एक नाम । ज्याचे शिवा प्रेम अनिवार ॥१५॥
अनिरुद्ध म्हणा अनिरुद्ध म्हणा । दु:खियांचे दु:ख बापू हरी ॥
हरी हर यात मानतो जो व्दैत । त्याचा परमार्थ व्यर्थ झाला ॥
दोघांचे एकत्व दावी गुरुदेव । ऎसी आहे माव सद्गुरुंची ॥
हरी हर मिळून झाले अवतीर्ण । गुरुरुपे दर्शन देती आम्हा ॥
जो विष्णु मुरारी तोच त्रिपुरारी । एक तो सर्वांतरी अनिरुद्ध ॥१६॥
अनिरुद्ध म्हणा अनिरुद्ध म्हणा । दु:खियांचे दु:ख बापू हरी ॥

हरीनाम घेता भेटे गुरु भक्ता । गुरुनाम घेता लाभे हरी ॥
होता हरी प्रसन्न भेटवी गुरुसी । लावी सत्पथासी गुरुरुपे ॥
सद्‌गुरुशिवाय ना दुजा उपाय । जोडण्या ते पाय श्रीहरीचे ॥
गुरु अनिरुद्ध भेटता अतूट । होई हरी प्रगट आपोआप ॥१७॥
अनिरुद्ध म्हणा अनिरुद्ध म्हणा । दु:खियांचे दु:ख बापू हरी ॥
नाम दोन अक्षरे सद्‌गुरुचरण । ठेवा घट्ट धरुन अहर्निश ॥
सद्‌गुरुचे पाय ज्याने दृढ धरीले । त्यास भय नुरले कळिकाळाचे ॥
नाम गळे अहम उमळते प्रेम । मिळे पद परम नामामुळे ॥
नको योग ज्ञान वेद मीमांसन । सोपे हे सोपान गुरुनाम ॥१८॥
अनिरुद्ध म्हणा अनिरुद्ध म्हणा । दु:खियांचे दु:ख बापू हरी ॥
नामे मन:शुद्धी नश्यते कुबुद्धी । साधते समृद्धी विवेकाची ॥
विवेकाच्या बळे वैराग्य उजळे । तेणे श्रद्धा फळे गुरुवरी ॥
श्रद्धा बळकट सबूरीची वाट । गुरुच्या निकट नेई त्वरे ॥
विवेक वैराग्य श्रद्धा व सबूरी । नामे प्राप्त चारी साधकासी ॥१९॥
अनिरुद्ध म्हणा अनिरुद्ध म्हणा । दु:खियांचे दु:ख बापू हरी ॥
शास्त्रांचे हे शास्त्र मंत्राचा हा मंत्र । नाम हे पवित्र अनिरुद्ध ॥
दर्शने कुंठली वादात गुंतली । तेथ नामे केली सुखपूर्ती ॥
वेद त्रिगुणात अडकूनी गेले । नामे उल्लंघले त्रिगुणासी ॥
एक नाम नेई त्रिगुणाच्या पार । ऎसे नाम थोर अनिरुद्ध ॥२०॥
अनिरुद्ध म्हणा अनिरुद्ध म्हणा । दु:खियांचे दु:ख बापू हरी ॥
नामाचा हा वन्हि चेतविता मनी । पापराशी जळुनी जाती साऱ्या ॥
नामरुपी आप हरी भवताप । होई निर्विकल्प मनोवृत्ती ॥
विष्णुपदतीर्थ नाम हे पावन । करा रे प्राशन हृदयाने ॥
नाम तोडी पाश नाम मुक्ताकाश। नाम हा प्रकाश कैवल्याचा ॥२१॥
अनिरुद्ध म्हणा अनिरुद्ध म्हणा । दु:खियांचे दु:ख बापू हरी ॥
नाम भागीरथी शिव धरी शिरी । पितरे उद्धरी नामगंगा ॥
नाम मोरपीस प्रिय श्रीहरीस । शोभे मुकुटास गोपाळाच्या ॥

कृष्णाचे स्वरुप कोणा न कळले । गोपांनी जाणले नामप्रेमे ॥
रामकृष्ण हरी विठ्ठल गोविंद । तोच अनिरुद्ध सदाशिव ॥२२॥
अनिरुद्ध म्हणा अनिरुद्ध म्हणा । दु:खियांचे दु:ख बापू हरी ॥
अध्यात्माच्या दुग्धी भक्ती नवनीत । नाम तेथ घृत सार त्याचे ॥
साराचे हे सार भक्तीचे माहेर । नाम मूलाधार महाविष्णुचा ॥
इतर धावती मुक्तिचिया पाठी । नाम घेता पाठी लागे मुक्ती ॥
सगुणभजने निर्गुणाची प्राप्ती । ऐसी फक्त शक्ती नामामध्ये ॥२३॥
अनिरुद्ध म्हणा अनिरुद्ध म्हणा । दु:खियांचे दु:ख बापू हरी ॥
अनिरुद्धपाठ सद्गुरुंचा माठ । हरीची ही पेठ गुरुनाम ॥
कासवीचे दृष्टी पोसे गुरुभक्ता । येई नाम घेता हा अनुभव ॥
गुरुनामचिंतनी जो लीन राहे । त्याची चिंता वाहे अनिरुद्ध ॥
कधीही कुठेही कुणीही हे घ्यावे । वाचे आळवावे अनिरुद्ध ॥२४॥
अनिरुद्ध म्हणा अनिरुद्ध म्हणा । दु:खियांचे दु:ख बापू हरी ॥
निंदा वाद बरळ हा वाचेचा विटाळ । हाती घ्यावे टाळ गावे नाम ॥
नाम एकतारी गर्जे ज्याच्या घरी । तेथेच श्रीहरी नित्य वसे ॥
अनिरुद्ध नामे लागले ज्या वेड । अव्यक्तापल्याड तोचि पावे ॥
योगीन्द्र हा दास अनिरुद्ध नाथ । त्यानेच हा पाठ वदवीला ॥२५॥
अनिरुद्ध म्हणा अनिरुद्ध म्हणा । दु:खियांचे दु:ख बापू हरी ॥
पाठ करी नित्य राखुनि सातत्य । त्यास दिसे सत्य बापुरुप ॥
गाई भक्तीभावे नामाचे पोवाडे । त्याच्या चोहीकडे बापू उभे ॥
नामाचा जो झाला नामी जो बुडाला । त्याचा रखवाला अनिरुद्ध ॥
अनिरुद्ध योगे योगीन्द्र हा धन्य । धरीले अनन्य गुरुनाम ॥२६॥
अनिरुद्ध म्हणा अनिरुद्ध म्हणा । दु:खियांचे दु:ख बापू हरी ॥
अनिरुद्ध म्हणा अनिरुद्ध म्हणा । दु:खियांचे दु:ख बापू हरी ॥